॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

*** सुविचार ***
कष्ट आणि प्रयत्नाशिवाय यश कधीच मिळत नाही.

■ अहिल्यानगर ■ बुधवार, दि. १० जून २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १६ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### भेसळ

दुग्धजन्य पदार्थांचे
रिपोर्ट येईनात ओके
भेसळीने पांढरे झाले
दुधामधले बोके
रसायनांनीच फुटतो
आता कृत्रिम पान्हा
दही, दुध, लोण्यासाठी
हतबल झालाय कान्हा

## SPOT NEWS

### कुकडी डावा कालव्याला दुसरे उन्हाळी आवर्तन

● **अहिल्यानगर** – श्रीगोंदा-पारनेर उपविभागाचे उपविभागीय दंडाधिकारी यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून श्रीगोंदा-पारनेर उपविभागाच्या महसूल स्थळसीमेच्या हद्दीत कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र. २ यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या उन्हाळी हंगाम आवर्तन क्र. २ (सन २०२५-२६) च्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत. या आदेशानुसार कुकडी डावा कालव्याच्या कि.मी. ११० ते १६५ दरम्यानच्या कालव्यालगतच्या परिसरात तसेच संबंधित वितरिकांच्या चोहोबाजूस १०० मीटर क्षेत्रात निर्बंध लागू करण्यात आले आहेत. उन्हाळी हंगाम आवर्तन क्र. २ ची प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी सक्षम अधिकाऱ्यांनी अधिकृत केलेल्या व्यक्तींव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस वाहनाने, पायी किंवा अन्य कोणत्याही रीतीने संबंधित परिसरात फिरण्यास, थांबण्यास अथवा समूहाने वावरण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

### कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर पर्यटन मार्गदर्शकांसाठी विशेष प्रशिक्षण

● **अहिल्यानगर** – आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर देश-विदेशातून मोठ्या संख्येने येणाऱ्या भाविक व पर्यटकांना दर्जेदार आणि व्यावसायिक मार्गदर्शन उपलब्ध व्हावे, तसेच पर्यटन क्षेत्रात कुशल मनुष्यबळ निर्माण व्हावे, या उद्देशाने पर्यटन संचालनालयाच्या वतीने 'पर्यटन मार्गदर्शक' हा विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

# लष्करी रणनीतीत ऐतिहासिक बदल!

**भारताने पहिल्यांदाच १२ अणूबॉंब ठेवले 'रेडी टू फायर' स्थितीत । जागतिक संस्था SIPRI चा धक्कादायक दावा**

● **नवी दिल्ली । वीरभूमी** –
जागतिक शस्त्रास्त्रे आणि सुरक्षा क्षेत्रावर लक्ष ठेवणारी स्वीडनची नामांकित संस्था 'स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूट' म्हणजेच 'सिपरी' च्या इयरबुक २०२६ च्या ताज्या अहवालातून भारताच्या लष्करी आणि आण्विक ताकदीबाबत अत्यंत महत्त्वाची आणि ऐतिहासिक माहिती समोर आली आहे. या अहवालानुसार, भारताने आपल्या अण्वस्त्र धोरणात मोठा बदल केला असून इतिहासात पहिल्यांदाच शांततेच्या काळात थेट १२ अण्वस्त्रे 'रेडी टू फायर' म्हणजेच प्रत्यक्ष कारवाईसाठी तैनात केली आहेत.

आतापर्यंत भारताचे अधिकृत धोरण हे आपली अण्वस्त्रे (वॉरहेड्स) आणि त्यांना वाहून नेणारी प्रक्षेपण प्रणाली (मिसाईल्स) वेगवेगळ्या ठिकाणी साठवून ठेवण्याचे होते. मात्र, बदलत्या जागतिक आणि प्रादेशिक राजकारणाच्या पार्श्वभूमीवर भारताने हे वॉरहेड्स प्रक्षेपकांशी जोडले असून ते तात्काळ वापरासाठी सज्ज ठेवल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

सिपरीच्या अहवालानुसार, भारताने आपल्या अण्वस्त्रांच्या एकूण साठ्यात वाढ केली असून हा आकडा आता १९० वर पोहोचला आहे. विशेष म्हणजे, इतिहासात पहिल्यांदाच भारताने अण्वस्त्रांच्या संख्येत आपला पारंपरिक प्रतिस्पर्धी असलेल्या पाकिस्तानला मागे टाकले आहे; सध्या पाकिस्तानकडे एकूण १७० अण्वस्त्रे असून त्यातील एकही अण्वस्त्र प्रत्यक्ष तैनात स्थितीत नाही. भारताचे हे आधुनिकीकरण प्रामुख्याने चीनचे आव्हान लक्षात घेऊन केले जात आहे. चीनने देखील आपल्या तैनात अणुबॉम्बची संख्या २०२५ मधील २४ वरून आता ३४ वर नेली असून चीनकडे एकूण ६२० अण्वस्त्रांचा मोठा साठा आहे.



अहवालातील दाव्यानुसार, भारताने 'आयएनएस अरिहंत' आणि 'आयएनएस अरिघात' या आपल्या अणू पाणबुड्यांवर ही अण्वस्त्रे तैनात केली असावीत, ज्या सध्या समुद्रात गस्त घालत आहेत. भारताचे अधिकृत धोरण नो फर्स्ट युज (आधी अण्वस्त्र हल्ला न करणे) असे आहे. त्यामुळे जर शत्रू देशाने भारतावर पहिला अणू हल्ला केला, तरीही समुद्रात लपलेल्या या पाणबुड्यांमधून शत्रूचा पूर्णपणे विनाश करण्याची अफाट क्षमता (सेकंड स्ट्राईक कॅपेबिलिटी) भारताने निर्माण केली आहे. याशिवाय 'एमआयआरव्ही' आणि कॅनिस्टर तंत्रज्ञानामुळे एकाच मिसाईलवरून एकाच वेळी अनेक वेगवेगळ्या लक्ष्यांवर अचूक मारा करणे भारताला शक्य झाले आहे.

### जागतिक स्तरावर अण्वस्त्रांची स्थिती

■ सिपरीच्या २०२६ च्या अहवालानुसार, सध्या जगभरात एकूण १२,१८७ अण्वस्त्रे आहेत, ज्यापैकी ९,७४५ अण्वस्त्रे लष्करी साठ्यात असून ४,०१२ अण्वस्त्रे विविध देशांनी तैनात केली आहेत. जगातील एकूण नऊ देशांकडे (अमेरिका, रशिया, ब्रिटन, फ्रान्स, चीन, भारत, पाकिस्तान, उत्तर कोरिया आणि इस्रायल) अण्वस्त्रे आहेत. यामध्ये अमेरिका आणि रशियाकडे सर्वाधिक अण्वस्त्रांचा साठा असून त्यांची हजारो अण्वस्त्रे हाय-अलर्टवर तैनात आहेत. आशियाई क्षेत्रातील वाढता तणाव पाहता भारत आता चीनच्या संपूर्ण भूभागावर लक्ष केंद्रित करू शकणाऱ्या लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्र प्रणालींचा विकास वेगाने करत असल्याचे या अहवालात अधोरेखित करण्यात आले आहे.

## नेप्ती कांदा मार्केटमध्ये शेतकऱ्याला मारहाण; चौघांविरूध्द गुन्हा दाखल

● **अहिल्यानगर । वीरभूमी** –
नेप्ती येथील कांदा मार्केटमध्ये कांद्याच्या गोण्यांमधून कांदे काढण्याच्या कारणावरून झालेल्या वादाचे पर्यवसान मारहाणीत झाले. या घटनेत एका शेतकर्याला दुचाकीच्या चैनने डोक्यात मारून जखमी करण्यात आले असून, नगर तालुका पोलीस ठाण्यात चौघांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

जखमी देविदास नागरे (वय ३५, रा. महींदा, ता. आष्टी, जि. बीड) यांनी सोमवारी (८ जून) सायंकाळी फिर्याद दिली आहे. गंगाधर नागरे (रा. बारदरी, ता. अहिल्यानगर) व तीन अनोळखीविरोधात गुन्हा नोंद झाला आहे.

फिर्यादी सकाळी साडेदहाच्या सुमारास नेप्ती येथील कांदा मार्केटमध्ये कांद्याच्या गोण्यांजवळ बसले होते. त्यावेळी संशयित आरोपी नागरे हा तेथे पडलेल्या कांद्याच्या गोणीतून कांदे काढत होता. यावेळी फिर्यादीने त्याला कांद्याचा लिलाव होऊ दे, त्यानंतर कांदे काढ असे सांगितल्याने आरोपी संतापला. त्याने फिर्यादीला शिवीगाळ करून तेथून निघून गेला. काही वेळानंतर नागरे हा आणखी तीन अनोळखी व्यक्तींना सोबत घेऊन घटनास्थळी परत आला. यातील तीन अनोळखी इसमांनी फिर्यादीला पकडून ठेवले, तर नागरे याने दुचाकीची चैन काढून नागरे यांना मारहाण करून जखमी केले. दरम्यान, जखमी नागरे यांच्यावर उपचार सुरू असतानाच फिर्यादीला त्यांचे चुलत भाऊ म्हातारदेव नागरे यांचा फोन आला. त्यात त्यांनाही संबंधित संशयित आरोपींनी मारहाण करून शिवीगाळ केल्याचे सांगितले.

## नदीत पोहण्यासाठी गेलेल्या दोघांचा बुडून मृत्यू

**नेवासा तालुक्यातील जुने भालगाव येथील दुर्दैवी घटना**

● **नेवासा । वीरभूमी** –
नेवासा तालुक्यातील जुने भालगाव येथे सोमवारी नदीच्या पाण्यात बुडून दोघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून या घटनेमुळे भालगाव परिसरात शोककळा पसरली आहे. मृतांमध्ये भास्कर देवराव तनपुरे (वय ५०) आणि सार्थक गणेश निमसे (वय १६, इयत्ता दहावी) यांचा समावेश आहे. दोघांनाही धार्मिक कार्याची विशेष आवड होती. जुने भालगाव येथील प्रसिद्ध महादेव मंदिरात दर सोमवारी कीर्तन व भंडार्याचा कार्यक्रम आयोजित केला जातो. सोमवारी झालेल्या भंडार्याच्या तयारीत व स्वयंपाकाच्या कामात दोघांनीही उत्साहाने सहभाग घेतला होता.

दुपारी सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास दोघे नदीत पोहण्यासाठी गेले. त्यानंतर ते घरी परतले नाहीत. मात्र कीर्तनाच्या कार्यक्रमासाठी थांबले असावेत, असा समज झाल्याने रात्रीपर्यंत त्यांच्या अनुपस्थितीकडे विशेष लक्ष गेले नाही. दरम्यान, मंगळवारी सकाळी सुमारे सहा वाजता नदीकाठी मासेमारीसाठी गेलेल्या काही युवकांना नदीकाठावर कपडे दिसून आले. संशय आल्याने त्यांनी परिसरात शोध घेतला असता नदीपात्रात दोघांचेही मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळून आले. अंदाजे १६ ते १८ तासांनंतर हे मृतदेह सापडल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.

घटनेची माहिती मिळताच शिवशंभो ॲम्बुलन्स सर्व्हिसचे चालक अनिल मोरे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत दोन्ही मृतदेह ग्रामीण रुग्णालय, नेवासा फाटा येथे हलविले. वैद्यकीय अधिकार्यांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. दोन्ही मृतदेहांचे शवविच्छेदन नेवासा ग्रामीण रुग्णालयात करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. भास्कर तनपुरे हे स्थानिक शेतकरी होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा व दोन मुली असा परिवार आहे. तर सार्थक निमसे हा कुटुंबातील एकुलता एक मुलगा असून त्याच्या पश्चात आई-वडील व दोन बहिणी आहेत. सार्थकच्या अकाली निधनाने गावकर्यांसह शालेय मित्रपरिवारातही मोठी शोकभावना व्यक्त होत आहे.

# आषाढी वारीसाठी जिल्ह्यासाठी ३.८६ कोटींचा निधी मंजूर

**पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील । वारकऱ्यांसाठी सोई-सुविधा उभारण्यासाठी शासनाकडून निधी**

● **शिर्डी । वीरभूमी** –
आषाढी वारी पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या आणि अहिल्यानगर जिल्ह्यातून मार्गक्रमण करणाऱ्या वारकऱ्यांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजने'अंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यास ३ कोटी ८६ लाख १० हजार रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

आषाढीवारीपालखीसोहळ्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून जगद्गुरू संत निवृत्तिनाथ महाराज, संत श्री एकनाथ महाराज, श्री संत निळोबाराय महाराज तसेच श्री संत ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारी पालखी (नेवासा) यांच्यासह इतर पालख्याही पंढरपूरकडे प्रस्थान करतात. या पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांसाठी तात्पुरती शौचालये, स्नानगृहे व स्वच्छतागृहे उभारणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे, औषधांचा पुरवठा करणे तसेच जलरोधक मंडप उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी विनंती मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. यासंदर्भातील प्रस्ताव जिल्हा परिषदेमार्फत शासनाकडे सादर करण्यात आला होता.



राज्यशासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत ३ कोटी ८६ लाख १० हजार रुपयांचा निधी मंजूर केला असून त्यास प्रशासकीय मान्यताही मिळाली आहे. या निधीतून वारकऱ्यांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मागील दोन वर्षांपासून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकाराने प्रशासनामार्फत जिल्ह्यातील पालख्या आणि वारकऱ्यांसाठी विविध सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

आषाढी वारी हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव आहे. या सोहळ्यात सहभागी होणाऱ्या अहिल्यानगर जिल्ह्यातील पालख्यांचे महत्त्व विशेष आहे. त्यामुळे या पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना उत्तम सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निधीची मागणी करण्यात आली होती. त्यांनी ही मागणी मान्य करून निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार, असे श्री.विखे पाटील यांनी सांगितले.



SPOT NEWS

## पेन्शनरांच्या प्रश्नांसाठी अहिल्यानगरात १३ जून रोजी 'संकल्प मेळावा'

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**
सेवानिवृत्त कर्मचारी व पेन्शनरांच्या विविध प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी अहिल्यानगर पेन्शनर असोसिएशनच्या वतीने शहरात 'संकल्प मेळावा' आयोजित करण्यात आला आहे. शनिवार, दि. १३ जून रोजी टिळक रोड येथील नंदनवन लॉन येथे हा मेळावा संपन्न होणार असून, लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी तसेच जिल्हाभरातील हजारो पेन्शनर या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. विधान परिषदेचे सभापती ना. प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या मेळाव्यास राज्याचे जलसंधारण मंत्री राधाकृष्ण विखे पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. पेन्शनरांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांना शासन आणि प्रशासनाच्या पातळीवर न्याय मिळावा, त्यांच्या विविध मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधले जावे आणि अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी ठोस भूमिका निश्चित व्हावी, हा या संकल्प मेळाव्याचा मुख्य उद्देश आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील निवृत्त कर्मचारी, शिक्षक, अधिकारी तसेच महिला पेन्शनर मोठ्या संख्येने या मेळाव्यात सहभागी होण्याचे आवाहन अहिल्यानगर पेन्शनर असोसिएशनचे अध्यक्ष द. मा. ठुबे गुरुजी, कार्याध्यक्ष रावसाहेब पवार, सरचिटणीस बन्सी उबाळे यांनी केले आहे.

## बँक ऑफ महाराष्ट्रच्या वाकोडी फाटा शाखेविरोधात आरबीआय लोकपालांकडे तक्रार

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**
बँक ऑफ महाराष्ट्रच्या वाकोडी फाटा शाखेच्या कामकाजाबाबत काही आक्षेप नोंदवत ग्राहक गणेश इंगळे यांनी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (आरबीआय) एकात्मिक लोकपाल योजनेअंतर्गत तक्रार दाखल केली असून, मृत खातेदाराच्या दाव्याच्या निपटाऱ्यात झालेला कथित विलंब, माहिती उपलब्ध करून देण्याबाबतची भूमिका तसेच खाते उघडण्याच्या प्रक्रियेदरम्यान कथित शुल्क आकारणीच्या आरोपांची चौकशी करण्याची मागणी केली आहे. तक्रारदार गणेश इंगळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत खातेदाराच्या वारसदाराच्या नात्याने आवश्यक कागदपत्रे एप्रिल २०२६ मध्ये शाखेत सादर करण्यात आली होती. संबंधित कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर दावा निकाली निघण्याबाबत शाखेकडून सकारात्मक माहिती देण्यात आल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. तथापि, उर्वरित प्रक्रिया पूर्ण होण्यास अपेक्षेपेक्षा अधिक कालावधी लागल्याचा दावा त्यांनी केला आहे.तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, विलंबाबाबत स्पष्ट लेखी माहिती मिळाली नसल्याने त्यांनी वारंवार शाखेशी संपर्क साधला. त्यानंतर त्यांनी आरबीआयच्या तक्रार निवारण पोर्टलवर तक्रार दाखल केली. तक्रारीवरील बँकेच्या उत्तरामध्ये ग्राहक पुढील प्रक्रियेसाठी शाखेत आला नाही असे नमूद करण्यात आल्याचे तक्रारदाराने सांगितले असून, संबंधित कारणाबाबतही स्वतंत्र चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, शाखेशी संलग्न असलेल्या बिझनेस करस्पाँडंट (बीसी) मार्फत खाते उघडण्याच्या प्रक्रियेत काही ग्राहकांकडून रक्कम घेतली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे. या बाबींची सत्यता पडताळून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी संबंधित यंत्रणेकडे केली आहे. तक्रारदाराने असेही म्हटले आहे की, त्यांनी मागविलेल्या काही कागदपत्रांपैकी मर्यादित माहिती उपलब्ध करून देण्यात आली असून, इतर काही कागदपत्रे व नोंदी अद्याप उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यामुळे संबंधित प्रकरणातील सर्व नोंदींची तपासणी करून आवश्यक माहिती उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# पोलिसांवर गोळीबार करून फरार आरोपीपैकी तिघे जेरबंद

### खरवंडी कासार येथे पोलिसांवर गोळीबार प्रकरण । तिघांना ११ जून पर्यंत पोलिस कोठडी

● **पाथर्डी । वीरभूमी –**
चोरीच्या गुन्ह्यातील आरोपींना पकडण्यासाठी गेलेल्या पाथर्डी पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण यांच्या संयुक्त पथकावर पिस्तुलातून गोळीबार करून पोलिसांना ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींपैकी तिघा आरोपींना पाथर्डी पोलिसांनी धाडसी पाठलाग करून जेरबंद केले आहे. या प्रकरणातील आणखी दोन आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक ४ जून २०२६ रोजी रात्री सुमारे १०.३० वाजण्याच्या सुमारास स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण यांचे पथक अक्कलकोट पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या जबरी चोरीच्या गुन्ह्यातील (गुन्हा रजि. क्र. ३४२/२०२६) फरार आरोपी पावलस उर्फ मेहेर कचरू गायकवाड (रा. भगवानगड रोड, खरवंडी कासार, ता. पाथर्डी) याला अटक करण्यासाठी पाथर्डी येथे आले होते. या कारवाईसाठी पाथर्डी पोलीस ठाण्याचे कर्मचारीही मदतीसाठी सहभागी झाले होते.

पोलीस पथक आरोपीच्या घरासमोर पोहोचले असता आरोपी पावलस उर्फ मेहेर गायकवाड याने पोलिसांना पाहून त्यांची विचारपूस केली. त्यावेळी पोलीस शिपाई आसाराम बटुळे यांनी आपण पोलीस असल्याचे सांगत तपासात सहकार्य करण्याचे आवाहन केले. मात्र आरोपीने पोलिसांचे कोणतेही ऐकून न घेता त्याच्याकडील पिस्तुलातून थेट पोलीस शिपाई आसाराम बटुळे यांच्या दिशेने गोळी झाडली. सुदैवाने ही गोळी त्यांच्या अंगावर न लागता जवळून गेल्याने मोठी दुर्घटना टळली.

गोळीबारानंतर आरोपीने पोलिसांवर बंदूक रोखून आपल्या साथीदारांसह घरासमोर उभ्या असलेल्या एक्सयूव्ही वाहनातून घटनास्थळावरून पलायन केले. याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीणचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय शिंदे यांच्या फिर्यादीवरून पावलस उर्फ मेहेर कचरू गायकवाड व त्याच्या इतर तीन साथीदारांविरुद्ध पाथर्डी पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यानंतर पाथर्डी पोलीस ठाण्याने दोन स्वतंत्र पथके तयार करून आरोपींचा शोध सुरू केला. दरम्यान, ९ जून २०२६ रोजी पहाटे या गुन्ह्यातील काही आरोपी खरवंडी परिसरात आल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचला असता आरोपी पोलिसांना पाहून पळून जाण्याचा प्रयत्न करू लागले. मात्र पोलिसांनी तात्काळ पाठलाग करून त्यांना ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान आरोपींनी आपली नावे सुदाम बबन राठोड (वय २५, रा. दुर्गानगर तांडा), कृष्णा बाळू पवळे (वय २४, रा. खरवंडी) आणि ईब्राहीम महमंद सय्यद (वय १९, रा. खरवंडी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) अशी सांगितली. त्यांनी आणखी दोन साथीदारांसह सदर गुन्ह्यात सहभाग असल्याची कबुली दिली आहे.

तिघा आरोपींना ९ जून रोजी अटक करण्यात आली असून न्यायालयासमोर हजर केले असता त्यांना ११ जून २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या गुन्ह्यातील आणखी दोन आरोपी अद्याप फरार असून त्यांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल लहाने करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोलीस निरीक्षक विलास पुजारी, पोलीस उपनिरीक्षक विशाल लहाने, संदीप ढाकणे, पोहेकॉ. बाबासाहेब बडे, पोलीस कॉन्स्टेबल संजय जाधव, इजाज सय्यद, सागर बुधवंत, ज्ञानेश्वर इलग, महेश रुईकर, गोकुळ वाघ, संदीप कळमकर, महिला पोलीस कॉन्स्टेबल शितल गुंजाळ तसेच चालक रविंद्र चव्हाण आणि गोविंद दराडे यांनी सहभाग घेतला.

या धाडसी कारवाईमुळे पोलिसांवर गोळीबार करून फरार झालेल्या आरोपींना जेरबंद करण्यात यश आले असून पाथर्डी पोलिसांच्या तत्परतेचे आणि धाडसाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## नागरदेवळेच्या मातीतून उगवली 'दृष्टीदान' क्रांती!

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**
एका छोट्याशा गावातून सुरू झालेली चळवळ आज हजारो कुटुंबांच्या आयुष्यात प्रकाश पेरत आहे. नगर तालुक्यातील नागरदेवळे येथील जालिंदर बोरुडे यांनी सामाजिक बांधिलकीतून सुरू केलेली नेत्रदान चळवळ आज अनेकांसाठी आशेचा किरण ठरली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या फिनिक्स सोशल फाऊंडेशनने मरणोत्तर नेत्रदानाच्या माध्यमातून तब्बल ११६० दृष्टीहीन व्यक्तींना नवदृष्टी मिळवून दिली आहे.

'नेत्रदान हेच सर्वश्रेष्ठ दान' या ब्रीदवाक्याने प्रेरित होऊन गेली तीन दशके सुरू असलेले हे कार्य आज राज्यभरात आदराने पाहिले जाते. फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून केवळ नेत्रदान जागृतीच नव्हे, तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी मोफत नेत्रतपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरांचे मोठे जाळे उभे करण्यात आले आहे.

जलसंपदा विभागात टेलिफोन ऑपरेटर म्हणून कार्यरत असताना जालिंदर बोरुडे यांच्या मनात समाजासाठी काहीतरी करण्याची इच्छा निर्माण झाली. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या कार्यातून प्रेरणा घेत त्यांनी १९९१ मध्ये फिनिक्स फाऊंडेशनची स्थापना केली. सुरुवातीला नेत्रदान क्षेत्रात काम करण्याचा कोणताही ठराविक विचार नव्हता. मात्र विडी कामगार, हमाल, बांधकाम मजूर, शेतकरी, कष्टकरी, महिला आणि गरीब घटकांमधील दृष्टीदोषाच्या समस्या पाहून त्यांनी या क्षेत्रात काम करण्याचा निर्धार केला. त्यानंतर सुरू झालेला प्रवास आज हजारो कुटुंबांच्या आयुष्यात प्रकाश आणणारा ठरला आहे.

फिनिक्स फाऊंडेशनच्या माध्यमातून दरमहा जिल्ह्यातील विविध भागांत मोफत नेत्रतपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरे आयोजित केली जातात. नागरदेवळे, पारनेर, शेवगाव, नेवासा, पाथर्डी तसेच नगर शहरात नियमितपणे ही शिबिरे भरविली जातात.

# जनगणनेत अहिल्यानगर महानगरपालिका राज्यात द्वितीय

### अवघ्या २०-२१ दिवसांत शत-प्रतिशत उद्दिष्ट पूर्ण

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**
भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या जनगणना अभियानात अहिल्यानगर महानगरपालिकेने राज्यात द्वितीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय कामगिरी नोंदविली. तब्बल ३० दिवसांसाठी नियोजित असलेले जनगणनेचे शत-प्रतिशत कार्य केवळ २० ते २१ दिवसांत पूर्ण करून महानगरपालिकेने कार्यक्षमता, नियोजन आणि संघभावनेचा आदर्श निर्माण केला.

सुमारे ६९२ प्रगणक व तेवढ्याच घर याद्या आणि सुमारे १२५ पर्यवेक्षकांच्या डिजिटल जनगणनेला प्रधान जनगणना अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर, सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे, जनगणना कक्ष प्रमुख राकेश कोतकर, सर्व प्रभाग अधिकारी, ब्रँड अँबेसिडर डॉ. अमोल बागुल, सर्व मास्टर ट्रेनर टेक्निकल टीम यांचे समन्वित नेतृत्व व अथक परिश्रम मोलाचे ठरले.

डांगे यांनी नमूद केले की विशेषतः नागरिकांचा लाभलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हे मोहिमेचे यश आहे.प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने स्वतःसाठी वेळेची उद्दिष्टे निश्चित करून शिस्तबद्ध पद्धतीने काम केल्यामुळे जनगणना मोहिमेला अपेक्षेपेक्षा अधिक वेग प्राप्त झाला.मोहिमेदरम्यान उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणी टेक्निकल टीमने तात्काळ सोडविल्या. दर चार दिवसांनी आढावा बैठका घेऊन पुढील चार दिवसांचे नियोजन, वेळापत्रक आणि आवश्यक उपाययोजना निश्चित करण्यात आल्या. त्यामुळे संपूर्ण अभियानात सातत्य, गती आणि अचूकता कायम राखण्यात यश आले.

जनजागृती आणि संवादावर विशेष भर देत विविध नाविन्यपूर्ण माध्यमांचा प्रभावी वापर करण्यात आला. प्रेरणादायी गीते, माहितीपर व्हिडिओ, दैनंदिन ग्राफिक इमेजेस, आकाशवाणीवरील मुलाखती, जिंगल्स, रिंगटोन्स तसेच विविध सोशल मीडिया हँडल्सच्या माध्यमातून केवळ नागरिकांचेच नव्हे तर प्रगणक आणि पर्यवेक्षकांचेही सातत्याने प्रबोधन करण्यात आले. यामुळे जनगणना मोहिमेला व्यापक लोकसहभाग लाभला. असे अतिरिक्त आयुक्त मुतकेकर यांनी प्रतिपादन केले.

# पारनेरमध्ये ब्रह्माकुमारी सेवा केंद्रात अधिक मासानिमित्त 'ब्रह्मा भोजन'चा आध्यात्मिक सोहळा

### धार्मिक प्रथांना दिला नवा दृष्टिकोन । शेकडो माता-भगिनी व बांधवांचा उत्स्फूर्त सहभाग

● **पारनेर । वीरभूमी–**
पारनेर येथील 'प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय' सेवा केंद्राच्या वतीने अधिक मास (धोंड्याचा महिना) निमित्त आयोजित करण्यात आलेला विशेष 'ब्रह्मा भोजन' कार्यक्रम केवळ धार्मिक विधी न ठरता, समाजाला प्रगल्भ आध्यात्मिक संदेश देणारा ठरला. या कार्यक्रमात तालुक्यातील शेकडो माता-भगिनी व बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाची सुरुवात राजेश्वरी दीदी, निर्मला दीदी, सुवर्णा दीदी, उज्वला दीदी, सविता दीदी, सुषमा दीदी आणि पद्मा दीदी यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी सेवा केंद्राच्या संचालिका साधना दीदी यांनी उपस्थितांचे स्वागत करून या उपक्रमाचे महत्त्व विशद केले.

कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक राजेश्वरी दीदी आणि निर्मला दीदी यांनी अधिक मासाचे आध्यात्मिक महत्त्व सांगताना परंपरेकडे पाहण्याचा नवा आणि सकारात्मक दृष्टिकोन उपस्थितांसमोर मांडला. त्या म्हणाल्या, अधिक मास हा तीन वर्षांतून एकदा येतो आणि हा काळ पुण्य संचयासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. आपण गोदान, अन्नदान किंवा वस्त्रदान करतोच, मात्र खऱ्या अर्थाने दान म्हणजे आपल्या मनातील विकारांचा त्याग करून सुख, शांती, प्रेम आणि आनंद यांसारख्या सद्गुणांचे वाटप करणे होय.

अधिक मासात मुलगी आणि जावयाला धोंडे खाऊ घालण्याच्या प्रथेवर प्रकाश टाकताना त्यांनी सांगितले की, ३३ आनरसे वाण देणे ही केवळ परंपरा नसून ३३ कोटी देवी-देवतांचे गुण आपल्या जीवनात आत्मसात करण्याचा तो एक संकल्प आहे. 'नर ते नारायण' होण्याचा प्रवास म्हणजे स्वतःमधील दैवी शक्ती जागृत करून सात्त्विक जीवन जगणे, हाच या परंपरेमागील खरा आध्यात्मिक संदेश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सुषमा दीदी यांनी अधिक मासाला 'ईश्वरी स्मृतीचा काळ' असे संबोधले. त्या म्हणाल्या की, ज्या प्रकारे ५ हजार वर्षांच्या सृष्टीचक्रानंतर परमात्मा पृथ्वीवर अवतरून आत्मा आणि परमात्मा यांचे मिलन घडवतात, त्याच स्मृतीप्रीत्यर्थ अधिक मास येतो. हा महिना माणसाला त्याची मूळ ओळख करून देणारा आणि ईश्वरी गुणांची आठवण करून देणारा आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले.

या उपक्रमामुळे उपस्थितांना केवळ अन्नाचा आस्वाद घेता आला नाही, तर त्यांच्या विचारांना एक नवी दिशा मिळाली. धार्मिक प्रथांकडे केवळ बाह्य आचरण म्हणून न पाहता, आंतरिक परिवर्तनाचे माध्यम म्हणून कसे पाहावे, हे या कार्यक्रमातून प्रभावीपणे मांडण्यात आले.



परिसरातील नागरिकांनी या अभिनव उपक्रमाचे स्वागत केले असून, ब्रह्माकुमारी सेवा केंद्राच्या समाजप्रबोधनपर कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. या कार्यक्रमामुळे पारनेरकरांच्या मनातील अधिक मासाविषयीची धारणा अधिक दृढ आणि आध्यात्मिक बनली आहे.

## SPOT NEWS



### आबासाहेब काकडे विद्यालयाची आदिती अजिनाथ विघ्ने हिस सुवर्णपदक

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

श्रीरामपुर येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय असोसिएशन पिच्याक सिलाट (Pencak Silat Championship) स्पर्धेमध्ये हसनापूर येथील व कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचच्या आबासाहेब काकडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु. आदिती अजिनाथ विघ्ने हिने या स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले.तसेच कु. आदिती हिला कराटे प्रशिक्षक श्री. शशिकांत नवगिरे सर व सौ.सुंदर नवगिरे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच कु. आदिती हिच्या यशस्वी कामगिरीमध्ये आई व वडील अजिनाथ विघ्ने यांचे मोठे योगदान लाभले आहे.तसेच आदिती हिने तिच्या शाळेचे नाव आणि तालुक्याचे नाव जिल्हास्तरावर गाजवले.

### जिल्ह्यातील महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांमध्ये पीआय दर्जाचे अधिकारी नेमा

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातील भिंगार, एमआयडीसी तसेच नगर तालुका यांसारख्या महत्त्वाच्या व संवेदनशील पोलीस ठाण्यांमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक (एपीआय) प्रभारी म्हणून कामकाज पाहत असल्याने या ठिकाणी पूर्णवेळ पोलीस निरीक्षक (पीआय) दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी विश्व मानवाधिकार परिषदेच्या वतीने पोलीस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी विश्व मानवाधिकार परिषदेचे प्रदेशाध्यक्ष नावेद शेख, जिल्हाध्यक्ष अजीम शेख, अल्ताफ शेख, सोहेल शेख, अरुण कोकडे, शरीफ सय्यद, सनाउल्लाहा तांबटकर आदीसह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की, भिंगार, एमआयडीसी व नगर तालुका ही पोलीस ठाणी क्षेत्रफळ, लोकसंख्या व संवेदनशीलतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहेत. मात्र या ठिकाणी सध्या एपीआय दर्जाचे अधिकारी प्रभारी म्हणून कार्यरत असल्याचे दिसून येते. आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती अधिक प्रभावीपणे हाताळण्यासाठी तसेच चोरी, दरोडे, खून, खंडणी, ताबामारी, बेकायदेशीर धंदे आदी गंभीर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी अनुभवी व वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांची आवश्यकता असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच प्रलंबित गुन्ह्यांचा तपास जलदगतीने पूर्ण करून वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी भिंगार, एमआयडीसी व नगर तालुका पोलीस ठाण्यांमध्ये पूर्णवेळ पीआय दर्जाचे अधिकारी नियुक्त करण्यात यावेत, अशी मागणी विश्व मानवाधिकार परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे.

# कसबा विभागातील विकासकामे मार्गी लावा, अन्यथा आंदोलन

**पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता व सुरक्षेसह विविध प्रश्नांबाबत नगरसेविका मंगल सोनटक्के यांचे पाथर्डी पालिकेला निवेदन**

**● पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक ४ (कसबा पेठ) परिसरातील विविध प्रलंबित विकासकामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत, अशी मागणी नगरसेविका सौ. मंगल पांडुरंग सोनटक्के यांनी नगराध्यक्ष अभय आव्हाड व नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. विकासकामांना गती न दिल्यास बैठा सत्याग्रह आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

यावेळी गटनेते देवा पवार, नगरसेविका सविता भापकर, सुरेखा हंडाळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष योगेश रासने, अक्रम आतार आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, प्रभागातील अनेक प्रश्न गेल्या काही काळापासून प्रलंबित असून, त्याबाबत वारंवार पाठपुरावा करूनही अपेक्षित कार्यवाही होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.



प्रभागातील कसबा पेठ, शेटे वस्ती, वाखुरे वस्ती तसेच परिसरातील विविध भागांमध्ये स्ट्रीट लाईटची व्यवस्था करून नियमित वीजपुरवठा सुरू करावा. तसेच शेटे वस्ती, वाखुरे वस्ती आणि वीटभट्टी परिसरात नवीन पाईपलाईन टाकून नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

खांडेकर वस्ती व कसबा परिसरातील रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात यावे. तसेच या भागात दर तीन दिवसांनी योग्य दाबाने पाणीपुरवठा करण्यात यावा, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

संत सावता माळी मंदिराजवळील रस्त्याच्या पुलाखाली मोठ्या नाल्याचे बांधकाम करण्यात यावे, जेणेकरून पावसाळ्यात पाण्याचा निचरा सुरळीत होईल. आगामी पावसाळा लक्षात घेऊन प्रभाग क्रमांक ४ मधील संपूर्ण परिसराची स्वच्छता करून गटारे व सार्वजनिक ठिकाणांची साफसफाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

याशिवाय, कसबा पेठ परिसरात आवश्यक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, तसेच शनि मंदिर परिसर आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळेजवळील धोकादायक बांधकामांबाबत योग्य उपाययोजना करून परिसर सुरक्षित करावा, अशा मागण्यांचाही निवेदनात समावेश आहे.

प्रभागातील नागरिकांना दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी नगरपरिषद प्रशासनाने तातडीने कार्यवाही करून विकासकामांना गती द्यावी, अन्यथा बैठा सत्याग्रह आंदोलन करण्यात येईल, असा इशारा नगरसेविका मंगल सोनटक्के यांनी दिला आहे.

### राज्यस्तरीय 'सनक्रिस्टल गुणगौरव पुरस्कार २०२६'ने भूषण नागापुरे यांचा सन्मान



**● पाथर्डी । वीरभूमी–**

सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे संत वामनभाऊ तरुण मंडळाचे सदस्य व युवा सामाजिक कार्यकर्ते भूषण नागापुरे यांना राज्यस्तरीय 'सनक्रिस्टल गुणगौरव पुरस्कार २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले.

सनक्रिस्टल एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक डॉ. संतोष मंगलाई आणि सदाशिव मचाले यांनी पुरस्कार जाहीर केला. व लोणावळा येथे ७ जून रोजी एका भव्य समारंभात मान्यवरांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी पोलीस निरीक्षक सचिन लोखंडे, इंग्लिश स्कूल महाराष्ट्र राज्यचे संस्थापक अध्यक्ष संजय तायडे पाटील, पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघटनेचे राजेश गायकवाड तसेच हर्षदा जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

भूषण नागापुरे यांनी आतापर्यंत अनेक वेळा रक्तदान करून गरजू रुग्णांना मदतीचा हात दिला आहे. याशिवाय विविध महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथी निमित्त अभिवादन कार्यक्रमांचे आयोजन, प्रभावी वक्तृत्वाच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन करण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे. विविध सामाजिक, शैक्षणिक आणि जनजागृतीपर उपक्रमांमध्ये सहभाग घेत समाजहिताची भावना जपण्याचा त्यांचा प्रयत्न कायम राहिला आहे.

### कर्जमाफीच्या अटी-शर्ती रद्द करण्यासाठी किसान सभेची अकोलेत निदर्शने

**● अकोले । वीरभूमी–**

राज्य शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफीच्या आदेशामध्ये मोठ्या प्रमाणात अटी व शर्ती घातल्यामुळे बहुसंख्य शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार असल्याचा आरोप करत अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने अकोले तहसील कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी तहसीलदारांना निवेदन देऊन शासनाने या अटी तातडीने रद्द कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.



निवेदनात म्हटले आहे की, २०१९ मध्ये ज्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला होता, त्यांना २०२६ च्या कर्जमाफी योजनेत केवळ ५० हजार रुपयांचा मर्यादित लाभ देण्यात येत आहे. त्यासाठीही संबंधित शेतकऱ्यांनी उर्वरित संपूर्ण कर्जाची परतफेड करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठीही किमान चार वेळा कर्जाची परतफेड केलेली असण्याची अट घालण्यात आली आहे. अशा शेतकऱ्यांनाही केवळ ५० हजार रुपयांपर्यंतच लाभ मर्यादित ठेवण्यात आल्याने मोठ्या प्रमाणात शेतकरी वंचित राहणार असल्याचा दावा किसान सभेने केला आहे.

सरकारने या सर्व अटी-शर्ती तातडीने रद्द करून शेतकऱ्यांचा सातबारा संपूर्ण कोरा करण्याचे दिलेले आश्वासन पाळावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

यावेळी घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली. तसेच विविध सहकारी संस्थांच्या अध्यक्ष व सचिवांना निवेदने देऊन त्यांच्या माध्यमातून राज्य सरकारपर्यंत शेतकऱ्यांच्या भावना पोहोचविण्याची मोहीमही किसान सभेने सुरू केली असल्याची माहिती अखिल भारतीय किसान सभेचे महाराष्ट्र राज्य सचिव डॉ. अजित नवले यांनी दिली.

## पारनेर ते पुणे एसटी बस

# निघोज-रांजणखळगे मार्गे सुरू करण्याची मागणी

**व्यापारी असोसिएशन व निघोज ग्रामस्थांचा पुढाकार । आमदार काशिनाथ दाते यांचे अधिकाऱ्यांना तातडीने निर्देश**

**● निघोज । वीरभूमी–**

पारनेर, देवीभोयरे मार्गे निघोज, जगप्रसिद्ध रांजणखळगे, टाकळी हाजी मार्गे पुणे अशी एसटी बस सेवा सुरू करण्यात यावी, या मागणीसाठी व्यापारी असोसिएशन व निघोज ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने आमदार काशिनाथ दाते यांची भेट घेतली. यावेळी आमदार दाते यांनी तत्काळ पारनेर व अहिल्यानगर येथील परिवहन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सूचना देत ही बस सेवा त्वरित सुरू करण्याबाबत निर्देश दिले.

या शिष्टमंडळात व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष बबनराव तनपुरे, विश्वस्त अनिल शेटे, दत्तात्रय चौधरी, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त रोहिदास लामखडे, विठ्ठलराव कवाद, संतोष लंके, पसायदान सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रामचंद्र महाराज सुपेकर आदींचा सहभाग होता. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष रखमाजी कापसे उपस्थित होते.

आमदार दाते यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसर पर्यटनाच्या दृष्टीने झपाट्याने विकसित होत आहे. मात्र, या मार्गावरून पुण्याकडे जाण्यासाठी थेट एसटी बस सेवा उपलब्ध नसल्याने पर्यटकांना अडचणींचा सामना करावा लागतो. ही बस सेवा सुरू झाल्यास अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यातील नागरिकांना एसटीने प्रवास करून या पर्यटनस्थळाचा आनंद घेता येईल.

तसेच, राज्यातील जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या मळगंगा देवीची निघोज व कुंड येथील मंदिरे असून, भाविकांच्या येण्या-जाण्याची सोयही या बसमुळे होणार आहे.

प्रस्तावित मार्ग पारनेर, वडझिरे, देवीभोयरे, निघोज, कुंड, टाकळी हाजी, मलठण, सांगवी, रांजणगाव गणपती, शिक्रापूर मार्गे पुणे असा असून, तो व्यापारी व उद्योजकांसाठीही अत्यंत सोयीचा ठरणार आहे. पुण्यात खरेदीसाठी जाणाऱ्या व्यावसायिकांना सकाळी या बसने जाऊन खरेदी आटोपल्यानंतर त्याच बसने परत येणे शक्य होणार आहे.

या बस सेवेचा लाभ किमान दहा ते बारा गावांतील ग्रामस्थ, व्यापारी आणि उद्योजकांना होणार असून, लवकरात लवकर ही एसटी बस सेवा सुरू करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

दरम्यान, आमदार काशिनाथ दाते यांनी अहिल्यानगर येथील एसटी परिवहन विभागाचे अधिकारी तसेच पारनेर आगारप्रमुख यांच्याशी संपर्क साधून पारनेर-पुणे एसटी बस सेवा



तातडीने सुरू करण्याच्या सूचना दिल्या. तसेच, येत्या आठ दिवसांत संबंधित मार्गाची पाहणी करून एसटी अधिकारी ही बस सेवा सुरू करतील, अशी ग्वाहीही त्यांनी शिष्टमंडळाला दिली.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# राशीनच्या श्री जगदंबा देवी मंदिरात संस्कृत शिलालेखाचा शोध

## मराठाकालीन धार्मिक, सांस्कृतिक व काव्यपरंपरेवर प्रकाश; इतिहास संशोधकांसाठी महत्त्वपूर्ण ठेवा

■ विजय उंडे

● श्रीगोंदा । वीरभूमी –

अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील राशीन येथील प्रसिद्ध श्री जगदंबा देवी मंदिर परिसरात आढळून आलेला संस्कृत शिलालेख इतिहास संशोधकांसाठी विशेष महत्त्वाचा ठरत आहे. मंदिराच्या मागील बाजूस असलेल्या ओवरीतील एका खांबावर कोरलेला हा शिलालेख देवनागरी लिपीत असून संस्कृत भाषेत लिहिलेला आहे. सात ओळींच्या उठाव स्वरूपातील या लेखावरील अक्षरे अनेक वर्षे उघड्यावर राहिल्याने तसेच सततच्या रंगरंगोटीमुळे काही प्रमाणात अस्पष्ट झाली होती. मात्र, शिलालेखाचा छाप घेतल्यानंतर त्यावरील मजकूर वाचण्यात यश आले.

या शिलालेखाचे वाचन पुण्यातील प्रसिद्ध शिलालेख अभ्यासक अनिल दुधाणे आणि डॉ. श्रीनंद बापट यांनी केले आहे.

शिलालेखामध्ये रेणुकादेवीच्या चरणकमलांप्रती अखंड भक्तिभाव व्यक्त करण्यात आला आहे. माणिक्यसूनु या उल्लेखातून एका भक्ताच्या वंशपरंपरेचा संदर्भ मिळतो. तसेच मत्पूर्वज आणि मदीयाः या शब्दांमधून देवीची उपासना पिढ्यान् पिढ्या चालत आलेली कुलपरंपरा असल्याचे स्पष्ट होते. पूर्वजांप्रमाणे पुढील पिढ्यांनीही देवीभक्ती अखंड सुरू ठेवावी, अशी प्रार्थना या लेखात करण्यात आली आहे.






शिलालेखात शालिवाहन शक १६७९, ईश्वर नाम संवत्सर, माघ शुक्ल अष्टमीचा उल्लेख असून, त्यानुसार ही नोंद बुधवार, १५ फेब्रुवारी १७५८ रोजीची असल्याचे अभ्यासकांनी सांगितले. त्या काळात छत्रपती रामराजे यांची कारकीर्द सुरू होती. तसेच श्रीकामकृष्ण आणि अनंत या व्यक्तींचा उल्लेखही लेखात आढळून येतो. देवीप्रती श्रद्धा व्यक्त करून धार्मिक कार्य व दान केल्याची स्मृती जतन करण्यासाठी हा शिलालेख कोरण्यात आल्याचे मानले जाते.

इतिहास संशोधकांच्या मते, हा शिलालेख केवळ धार्मिक नोंद नसून मराठाकालीन संस्कृत काव्यपरंपरा, कुलदैवत उपासना, स्थानिक दाते आणि तत्कालीन सामाजिक-सांस्कृतिक जीवन यांचा महत्त्वपूर्ण पुरावा आहे. वांघ्रिसरोजयु यांसारख्या काव्यात्मक शब्दप्रयोगांमुळे या लेखाची साहित्यिक बाजूही अधोरेखित होते.

सदर शिलालेखाचे शोधकार्य, छाप, संदर्भ संकलन आणि वाचन अनिल दुधाणे व डॉ. श्रीनंद बापट यांनी केले. या कार्यासाठी जगदंबा देवी ट्रस्ट, राशीनचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सर्व पदाधिकारी व सेवेकरी यांचे सहकार्य लाभले. तसेच शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन संचलित शिवदुर्ग वारसा संवर्धन समितीचे राजेश इंगळे, दिगंबर भुजबळ आणि सचिन भोसले यांचेही मोलाचे सहकार्य लाभल्याचे नमूद करण्यात आले आहे.

# बालविवाहमुक्तीसाठी असुरक्षित वस्त्यांच्या दारात स्नेहालय उडान

## अहिल्यानगर जिल्हा २०२७ पर्यंत बालविवाहमुक्त करण्यासाठी घराघरांत जनजागृती अभियान

● अहिल्यानगर । वीरभूमी–

बालविवाह रोखणे, बालकांचे संरक्षण करणे आणि बालविवाहग्रस्त बालकांचे पुनर्वसन करणे या त्रिसूत्री उद्दिष्टांना केंद्रस्थानी ठेवून स्नेहालय संचलित 'उडान' प्रकल्पाने अहिल्यानगर जिल्हा २०२७ अखेरपर्यंत बालविवाहमुक्त करण्याचे महत्त्वाकांक्षी ध्येय स्वीकारले आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी ग्रामीण भागातील प्रत्येक गावात तसेच शहरी भागातील असुरक्षित वस्त्यांमध्ये व्यापक जनजागृती अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती उडान प्रकल्पाचे व्यवस्थापक प्रवीण कदम यांनी दिली.



याच अभियानाचा एक भाग म्हणून सिद्धार्थनगर येथील डॉ. कलाम बालभवन आणि परिसरातील झोपडपट्टी भागात विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. उडान प्रकल्पाचे व्यवस्थापक प्रवीण कदम यांच्या मार्गदर्शनाखाली बालभवन समन्वयक विना वेडेपल्ली, सामाजिक कार्यकर्ते कुणाल कदम, प्रतीक्षा वाघ आणि स्वयंसेवक सानिका जावळे यांनी नागरिक, पालक आणि बालकांशी थेट संवाद साधला.

बालविवाहाच्या घटनांचा अभ्यास करताना सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या असुरक्षित वातावरणात वाढणाऱ्या मुली बालविवाहाच्या जोखमीला अधिक सामोऱ्या जात असल्याचे दिसून आले आहे. विशेषतः झोपडपट्टी परिसरात शिक्षणाचा अभाव, असुरक्षितता, गरिबी आणि जागृतीचा अभाव यामुळे बालविवाहाची शक्यता वाढत असल्याने अशा वस्त्यांमध्ये प्रथम पोहोचणे आवश्यक असल्याच्या विचारातून उडान प्रकल्पाने या भागांवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

या अभियानादरम्यान बालविवाह प्रतिबंधक कायदा, बाल लैंगिक शोषण प्रतिबंध, बालकांचे मूलभूत हक्क, शिक्षणाचे महत्त्व, बालसुरक्षा तसेच १०९८ चाइल्ड हेल्पलाइनविषयीची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आली. कार्यकर्त्यांनी घरोघरी भेट देत कुटुंबांशी संवाद साधला, माहितीपत्रकांचे वितरण केले आणि बालविवाहाचे दुष्परिणाम समजावून सांगितले.

विशेष म्हणजे, हा उपक्रम केवळ जनजागृतीपुरता मर्यादित नसून स्थानिक पातळीवर कायमस्वरूपी संरक्षण यंत्रणा उभारण्याचाही प्रयत्न आहे. यासाठी डॉ. कलाम बालभवन, अंगणवाडी सेविका, स्थानिक नागरिक आणि समुदाय नेत्यांना या मोहिमेत सहभागी करून घेतले जात आहे. प्रत्येक झोपडपट्टी, प्रत्येक कुटुंब आणि प्रत्येक बालकापर्यंत पोहोचून बालविवाहाविरोधात सामाजिक वातावरण निर्माण करण्यासाठी उडान प्रकल्प सातत्याने प्रयत्नशील आहे.

बालविवाहमुक्त झोपडपट्टी, सुरक्षित बालपणाची हमी या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या या अभियानाद्वारे शेकडो नागरिकांपर्यंत जनजागृती पोहोचली आहे. बालकांचे शिक्षण, संरक्षण आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार अबाधित राखण्यासाठी समाजाने एकत्र येणे ही काळाची गरज असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रत्येक गाव आणि प्रत्येक सेवा वस्ती बालविवाहमुक्त करण्याचा निर्धार व्यक्त करत उडान प्रकल्पाची ही मोहीम आता सामाजिक परिवर्तनाच्या व्यापक चळवळीत रूपांतरित होत असल्याचे दिसून येत आहे.

# अधिक मासातील कालाष्टमी-नवमी निमित्त श्री क्षेत्र मोहटादेवी गडावर भाविकांची मोठी गर्दी



● पाथर्डी । वीरभूमी–

उन्हाळी सुट्ट्या तसेच अधिक मासातील मंगळवारी आलेल्या कालाष्टमी व नवमीच्या विशेष पर्वणीचे औचित्य साधत हजारो भाविकांनी श्री क्षेत्र मोहटादेवी गडावर दर्शनासाठी मोठी गर्दी केली. भाविकांना सुलभ व सुरळीत दर्शन घेता यावे, यासाठी देवस्थानच्या वतीने उत्कृष्ट नियोजन करण्यात आले होते.

गडावर पहाटेपासूनच देवीच्या दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. आई राजा उदो उदोच्या जयघोषाने संपूर्ण गड परिसर भक्तिमय वातावरणात दुमदुमून गेला होता. उन्हाचा त्रास होऊ नये यासाठी पिण्याच्या पाण्याची तसेच सावलीची विशेष व्यवस्था करण्यात आली होती.

भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन पार्किंग व्यवस्था, दर्शन रांगा, जागोजागी पिण्याच्या पाण्याची सुविधा, तसेच दर्शन रांगेत सर्क्युलेटिंग फॅनची व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे भाविकांना कोणताही त्रास न होता शांततेत व सुलभ पद्धतीने देवीचे दर्शन घेता आले.

दर्शनासाठी आलेल्या सर्व भाविकांसाठी देवस्थानच्या वतीने महाप्रसादाचेही नियोजन करण्यात आले होते.

देवस्थानचे अध्यक्ष तथा धर्मादाय उपआयुक्त नवनाथ जगताप व विश्वस्त मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली भाविकांची गर्दी लक्षात घेऊन विविध सुविधांचे विशेष नियोजन करण्यात आले होते. देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे व जनसंपर्क अधिकारी भिमराव खाडे यांनी देवस्थानच्या वतीने आलेल्या भाविकांचे स्वागत केले. तसेच संपूर्ण व्यवस्थेवर बारकाईने लक्ष ठेवून दर्शन व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

भाविकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे श्री क्षेत्र मोहटादेवी गड परिसरात दिवसभर भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळाले.

# वन विभागातील कथित गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी मुंबईच्या आझाद मैदानात आमरण उपोषण

## उपवन संरक्षकांसह अधिकाऱ्यांच्या निलंबनाची मागणी । जन आक्रोश सोशल असोसिएशनचा वन विभागातील अनागोंदीविरोधात एल्गार

● अहिल्यानगर । वीरभूमी–

अहिल्यानगर वन विभागातील कथित गैरव्यवहार, भ्रष्टाचार आणि आर्थिक अनियमिततांची स्वतंत्र यंत्रणेमार्फत चौकशी करण्यात यावी, तसेच संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे या मागणीसाठी जनहितार्थ जन आक्रोश सोशल असोसिएशन (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने मुंबई येथील आझाद मैदानावर मंगळवार (दि. ९ जून) पासून आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रघुनाथ आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू असून शासनाने तत्काळ दखल घ्यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.

या आंदोलनात रावसाहेब वर्पे पाटील, बबनराव झरेकर, हरेश्वर साळवे, राधेश्याम हिवाळे, बबनराव देशमुख, जगदीश आंबेडकर, नामदेव खोमणे, बाबासाहेब महापुरे, बाबासाहेब डोळस, देवेंद्र गावडे, विजय सासवडे यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले आहेत.

संघटनेच्या निवेदनानुसार, अहिल्यानगर येथील उपवन संरक्षक आणि वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्यासह काही अन्य अधिकाऱ्यांनी विविध शासकीय योजनांतील निधीमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात मुख्यमंत्री, वनमंत्री, पालकमंत्री, मुख्य सचिव, जिल्हाधिकारी तसेच वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वारंवार लेखी तक्रारी करण्यात आल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. मात्र, अद्याप कोणतीही चौकशी अथवा कारवाई झालेली नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

आंदोलकांच्या म्हणण्यानुसार, अवैध लाकूड वाहतूक, चंदन तस्करी, विनापरवाना व परवानाधारक आरा गिरण्या तसेच विविध ना हरकत प्रमाणपत्रांशी संबंधित व्यवहारांबाबत यापूर्वीही तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. या तक्रारींची चौकशी का होत नाही, असा प्रश्न उपस्थित करत संबंधित प्रकरणाची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

संघटनेने दावा केला आहे की, अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध विकासकामे, वनसंवर्धन योजना आणि जिल्हा नियोजन समितीमार्फत मिळणाऱ्या निधीच्या खर्चात अनियमितता झाल्याचा संशय आहे. काही जुनी कामे नव्याने दाखवून शासकीय निधीचा अपव्यय झाल्याचा आरोपही संघटनेने केला आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या कथित अवैध संपत्तीची चौकशी करून आवश्यक ती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

यापूर्वीही नाशिक येथील मुख्य वनसंरक्षक कार्यालयासमोर तसेच अहिल्यानगर येथील उपवन संरक्षक कार्यालयासमोर विविध तारखांना आमरण उपोषण करण्यात आले होते. मात्र त्यानंतरही कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे. त्यामुळे आता राज्य शासनाने तात्काळ हस्तक्षेप करून स्वतंत्र चौकशी समिती नेमावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.



संघटनेच्या निवेदनात त्या उपवन संरक्षकाची झालेली बदली रद्द करण्यात आल्याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. त्यांच्या बदलीची तात्काळ अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली असून संबंधित अधिकारी आणि त्यांच्या अधिपत्याखालील काही वन अधिकाऱ्यांवर निलंबन अथवा बडतर्फीची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, शासनाने या सर्व आरोपांची सखोल चौकशी करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा जन आक्रोश सोशल असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.